# अधिसूचना

क्र.कलि/उजिअ/भूस/सामान्य/कावि 216 /2016
कार्यालय उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य) वर्धा
दिनांक :- 18.10.2016

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ अन्वये कलम १९(१) खालील अधिसूचना

**प्रकरण क्रमांक :- १२५/एलएक्यु-४७/०१०-०११ मौजा: :- माळेगांव(ठेका) तालूका :- आर्वी जिल्हा-वर्धा**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतूकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसुल व वनविभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्रं.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी,२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या **अनुसूची** एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसूची दोन** मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, सदर्हु प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणरी कारणे, यासोबत जोडलेल्या **अनुसूची तिन** मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या **अनुसूची चार** मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे. त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिक-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतिची जिल्हाधिकाऱ्यांकड्न भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालिल जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी भूसंपादन, (सामान्य) वर्धा** यास पदनिर्देशित करीत आहे.

/

## अनुसूची-एक
## जमिनीचे वर्णन

प्रकरण क्रमांक १२५/एलएक्यु-४७/०१०-०११ मौजाः माळेगांव(ठेका) तालूका :- आर्वी जिल्हा-वर्धा

| अनु.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर. मध्ये) | अनु.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर. मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२६ | ०.३० | १० | २०२/२ | ०.२६ |
| २ | २२७ | ०.०२ | ११ | २०१ | ०.२६ |
| ३ | २२८/१ | ०.२५ | १२ | २०/१ | ०.०१ |
| ४ | २३० | ०.२१ | १३ | १९ | ०.२८ |
| ५ | २३१/१ | ०.१७ | १४ | १८/१ | ०.०७ |
| ६ | २३३ | ०.५८ | | | |
| ७ | २४०/२ | ०.०९ | | | |
| ८ | २४०/१ | ०.१४ | | | |
| ९ | २४२ | ०.१५ | एकुण | | २.७९ |

## अनुसूची दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

संपादन संस्थेचे नावः - का.अ. लघु पाटबंधारे वि. वर्धा

प्रकल्पाचे प्रयोजन — मदन धरणापासुन ते माळेगांव (ठेका) गावापर्यंत वळण रस्त्याकरीता.

समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक,रोजगार,पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) — सामाजिक कल्याण साधण्याकरिता कालवा

## अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे — कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

## अनुसूची चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) - भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १०(क) व त्या अनुषंगाने महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना दि. १३ मार्च २०१५ अन्वये सामाजिक प्रमाण निर्धारणातून सूट.

## अनुसूची पाच
### नियुक्त केलेल्या प्रकशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : निरंक

ब. प्रशासनाच्या कायालयाचा पत्ता : निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्तीकरण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे) निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य),वर्धा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :-
ठिकाण:- वर्धा

(शैलेश नवाल)
जिल्हाधिकारी, वर्धा